# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

दिनांक 27/07/2021 (मंगळवार)

(सायंकाळ)

---

## 24 तासाच्या आत ट्रैक्टर चोरी चा आरोपी मध्यप्रदेश येथुन जेरबंद
## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक 24.07.2021 रोजी फिर्यादी जर्नाधन व्यंकटराव मदीपाटी वय 46 वर्षे रा. डुमरी कन्हान यांचे फिर्यादीवरून जांनडियर कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एमएच 40 बीई 5008 व ट्रॉली क्र. एमएच 31 जी 9619 चोरी गेलेच्या तक्रारीवरून सदर गुन्हा नोंद झाल्याने सदर गुन्हयाचे गांर्भीय पाहता स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टवार यांचे मार्गदर्शनाने सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असता मध्यप्रदेश येथील मुखबिराकडुन माहिती मिळाली की, संशयीत आरोपी संतोष अंनतराम सोनवने हा आपल्या शेतात ट्रॅक्टर आणुन शेतात फिरवत असल्याने खात्रीशिर माहितीवरून सदर पथक तात्काळ गाव बडपानी जिल्हा बालाघाट मध्यप्रदेश येथे रवाना होवुन आरोपीचे घरी सापळा रचुन त्यास ताब्यात घेवुन ट्रॅक्टर बाबत सखोल विचारपुस केली असता त्याने सदरचे ट्रॅक्टर व ट्रॉली चोरी केल्याची कबुली दिल्याने आरोपीचे ताब्यातुन ट्रॅक्टर क्र. एमएच 40 बीई 5008 कि. 3,00,000/— रू. व ट्रॉली क्र. एमएच 31 जी 9619 कि. 60,000/— रू चा माल ताब्यात घेवुन सदर चा गुन्हा उघडकीस आणला. आरोपी व माल पुढील कार्यवाही करीता पोस्टे कन्हान यांचे ताब्यात देण्यात आला.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक अनिल राऊत, सहा.फौजदार लक्ष्मीप्रसाद दुबे, पोलीस हवालदार विनोद काळे, नापोशि शैलेश यादव, अरविंद भगत, सत्यशिल कोठारे, पोलीस शिपाई प्रणय बनाफर, विरेंद्र नरड, विरेंद्र यादव, सुधीर चौहान आणि चालक सफौ साहेबराव बहाळे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर